- 1 SEP 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. शिंदे हे पदाचा लौकिक वाढवतील

## डॉ. डी. टी. शिर्के यांचे मत : शिवाजी विद्यापीठात नूतन कुलसचिवांचे स्वागत

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मातृसंस्थेप्रती निष्ठा आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या बळावर डॉ. व्ही. एन. शिंदे शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिव पदाचा लौकिक उंचावतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी व्यक्त केला. विद्यापीठाचे नूतन कुलसचिव यांचे विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने औपचारिक स्वागत करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाचे विद्यार्थी असलेल्या डॉ. शिंदे यांनी येथे शिक्षक, प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करीत कुलसचिवपदापर्यंत मजल मारली आहे, ही अतिशय अभिमानास्पद बाब आहे. या पदावरील व्यक्तीकडून वरिष्ठांसह सर्व घटकांच्या अपेक्षा असतात. त्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत असते. मात्र, डॉ. शिंदे हे त्यांच्या अनुभवाच्या बळावर त्यांची कारकीर्द संस्मरणीय बनवतील.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठात उपकुलसचिव पदावर काम करीत असताना जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन असे व्यक्तिगत प्राधान्याचे विषय घेऊन काम करीत आलो. मात्र, कुलसचिव पदाच्या कारकिर्दीत संस्थात्मक कामे ही सर्वोच्च प्राधान्याचा विषय असतील. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले. आस्थापना विभागाचे उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे यांनी आभार मानले. व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या डॉ. सरिता ठकार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. एस. एन. सपली, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रशासनाच्या वतीने गुरुवारी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी औपचारिक स्वागत केले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांचे प्रशासनातर्फे स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्यासह अधिकारी.

# डॉ. शिंदे कुलसचिव पदाचा लौकिक उंचावतील

## कुलगुरू डॉ. शिर्के; विद्यापीठात नूतन कुलसचिवांचे स्वागत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मातृसंस्थेप्रती निष्ठा व प्रामाणिकपणा या गुणांच्या बळावर डॉ. व्ही. एन. शिंदे शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिव पदाचा लौकिक उंचावतील, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

नूतन कुलसचिव डॉ. शिंदे यांचे गुरुवारी विद्यापीठ प्रशासनातर्फे औपचारिक स्वागत करण्यात आले. त्यावेळी अध्यक्षपदावरून ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाचे विद्यार्थी असलेल्या डॉ. शिंदे यांचा शिक्षक, प्रशासकीय अधिकारीपासून कुलसचिव पदापर्यंतचा प्रवास अभिमानास्पद आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, डॉ. शिंदे यांची कामावरील निष्ठा उल्लेखनीय आहे. विद्यापीठ नेहमीच त्यांच्या प्राधान्यक्रमावर सर्वोच्चस्थानी असते.

सत्काराला उत्तर देताना कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठात उपकुलसचिव पदावर काम करीत असताना जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन असे व्यक्तिगत प्राधान्याचे विषय घेऊन काम करीत आलो. मात्र, कुलसचिव पदाच्या कारकिर्दीत संस्थात्मक कामे ही सर्वोच्च प्राधान्याचा विषय असतील. कुलगुरू, प्र-कुलगुरू यांनी जबाबदारी सोपवून दाखवलेला विश्वास सार्थ ठरविण्याचा प्रयत्न राहील.

मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले. आस्थापना विभागाचे उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस.एन. सपली, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार उपस्थित होत्या.

- 1 SEP 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. व्ही. एन. शिंदे कारकीर्द संस्मरणीय बनवतील : डॉ. शिर्के

## नूतन कुलसचिवांचे विद्यापीठात स्वागत

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : मातृसंस्थेप्रती निष्ठा आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या बळावर डॉ. विलास शिंदे शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदाचा लौकिक उंचावतील. अनुभवाच्या बळावर कारकीर्द संस्मरणीय बनवतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे व्यक्त केला.

नूतन कुलसचिव डॉ. शिंदे यांचे आज विद्यापीठ प्रशासनातर्फे औपचारिक स्वागत करण्यात आले. त्यावेळी अध्यक्षपदावरून ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यापीठाचे विद्यार्थी असलेल्या डॉ. शिंदे यांनी येथे शिक्षक, प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करीत आज कुलसचिव पदापर्यंत मजल मारली आहे, ही अभिमानास्पद बाब आहे. विद्यापीठाच्या सर्व घटकांचे त्यांना सहकार्य लाभेल.'

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यापीठात उपकुलसचिव पदावर काम करताना जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन असे व्यक्तीगत प्राधान्याचे विषय घेऊन काम करीत आलो. मात्र, कुलसचिव पदाच्या कारकीर्दीत संस्थात्मक कामे ही सर्वोच्च प्राधान्याचा विषय असतील. त्यामध्ये उपरोक्त कामांचाही समावेश असेल. कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी ही जबाबदारी सोपवून जो एक विश्वास दाखविला आहे, तो सार्थ करण्याचा प्रयत्न राहील. त्यासाठी सर्व सर्वांना सोबत घेऊन विद्यापीठ हितासाठी काम करीत राहीन.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे प्रशासनातर्फे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी शेजारी नीलेश बनसोडे, प्रकाश गायकवाड, एम. एस. देशमुख, अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.



डॉ. सरिता ठकार, अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, एस. एन. सपली, प्रकाश गायकवाड, शरद बनसोडे, रामचंद्र पवार, तानाजी चौगुले आदी उपस्थित होते. डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत केले. उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे यांनी आभार मानले.

सकाळ

# जागतिक शास्त्रज्ञांच्या क्रमवारीत डॉ. आण्णासाहेब मोहोळकर

## अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाचे सर्वेक्षण

कोल्हापूर, ता. ३१ : अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने २०२३ या वर्षी घेतलेल्या सर्वेक्षणात शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. आण्णासाहेब मोहोळकर यांना जागतिक क्रमवारीत टॉप २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळाले आहे. त्यांना सलग चौथ्यांदा या क्रमवारीत गौरविले आहे.

डॉ. मोहोळकर यांच्या शोधनिबंधांना आजवर ८५४० सायटेशन मिळाली आहेत. त्यांच्या या यशामुळे शिवाजी विद्यापीठाचा सायटेशन व प्रगती आलेख वाढत चालला आहे. या निमित्ताने विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय बहुमान मिळाला आहे. परदेशातील नामवंत शास्त्रज्ञ त्यांच्या संशोधनामध्ये त्यांचे मार्गदर्शन, सहकार्य घेतात. अल्पेर-डोजर (एडी) सायंटिफिक इंडेक्सने २२ ऑगस्टला प्रसिद्ध केलेल्या टॉप २ टक्के जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीमध्ये त्यांना सलग चौथ्यांदा स्थान मिळाले आहे. या सर्वेक्षणात त्यांना शिवाजी विद्यापीठातून ऊर्जा अभियांत्रिकी क्षेत्रात अव्वल स्थान



**डॉ. मोहोळकर**

मिळाले आहे. आपल्या संशोधन अभिवृत्तीस चालना देऊन त्यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांना आजवर अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

### सौर ऊर्जा, गॅस सेन्सिंगवर संशोधन

डॉ. मोहोळकर यांनी मटेरियल सायन्स क्षेत्रात केलेल्या संशोधनाची दखल जागतिक स्तरावर घेतली आहे. सध्या ते सौर ऊर्जा, गॅस सेन्सिंग, सुपरकपॅसिटर, वॉटर स्प्लिटिंग, हायड्रोजन एनर्जी आदी विषयांवर पुढील संशोधन करीत आहेत. त्यांनी कित्येक गरीब होतकरू विद्यार्थ्यांना पोस्ट डॉक्टरेटसाठी परदेशी पाठवून विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या गुणवत्तेला चालना दिली आहे.

- 1 SEP 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ क्षेत्रात होणार तालुकास्तरावर क्रीडा महाविद्यालय

## अधिकार मंडळांची मान्यता : विद्यापीठाने मंजुरीसाठी पाठवला राज्य शासनाला प्रस्ताव : बृहत आराखड्यात प्रत्येक तालुक्यात एक महाविद्यालय स्थळबिंदूची केलीय तरतूद

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात प्रत्येक तालुक्यात क्रीडा महाविद्यालय असावे, अशी बृहत आराखड्यात स्थळबिंदूची तरतूद केली आहे. विद्यापीठाच्या सर्व अधिकार मंडळांची मान्यता घेऊन हा बृहत आराखडा राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन पातळीवरच तज्ज्ञ क्रीडा शिक्षकांकडून प्रशिक्षण मिळावे, याद्वारे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू तयार करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

पुण्यामध्ये क्रीडा विद्यापीठाची स्थापना केली आहे. या धर्तीवर शिवाजी विद्यापीठात किमान



प्रत्येक तालुक्याला एक क्रीडा महाविद्यालय असावे, अशी मागणी अधिसभा, व्यवस्थापन सदस्यांची होती. त्यादृष्टीने विद्यापीठाच्या बृहत आराखड्यात प्रत्येक तालुक्याला क्रीडा महाविद्यालय असावे, असा स्थळ बिंदू मंजूर केला आहे. विद्यार्थ्यांत फुटबॉल, ॲथलेटिक्स, कबड्डी, कुस्ती, अशा त्यांच्या आवडीचे क्रीडा शिक्षण घेऊन करिअर करता येणार आहे.

दरम्यान, क्रीडा महाविद्यालयाचा हा प्रस्ताव विद्यापीठाने शासनाकडे मान्यता, मंजुरीसाठी पाठवला आहे. शासन मंजुरीनंतरच कोल्हापूरच्या

तरुण भारत संवाद
विशेष वृत्त

खेळाडूंना स्थानिक पातळीवर योग्य मार्गदर्शन मिळणार आहे. खेळाडूने राष्ट्रीय स्तरावर पदकांची कमाई केली की त्याला सरकारी नोकरी मिळते. त्यामुळे सध्या क्रीडा क्षेत्राचे ग्लॅमर वाढत आहे. शाळा-महाविद्यालयांतील खेळाडू चांगली कामगिरी करत आहेत. गावोगावच्या अकॅडमीतून खेळाडूही चांगले करिअर करत आहेत. प्रशिक्षण संस्थेतून अनेक खेळाडू तयार होतात. खेळाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती हाच क्रीडा महाविद्यालयांमागे उद्देश आहे.

शिवाजी विद्यापीठाने राज्यस्तरीय कुलगुरू चषक क्रिकेट, आंतरविद्यापीठ ऑल इंडिया कुस्ती, शिवस्पंदन स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले. विद्यापीठाच्या खेळाडूंनी ॲथलेटिक्स, कुस्ती, वेटलिफ्टिंग, बॉक्सिंग, तलवारबाजी, खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, सॉफ्टबॉल, हँडबॉल, फुटबॉल, तायक्वाँदो, ज्युदो जिम्नॅस्टिक, मल्लखांब आदींमध्ये वेस्ट झोन, ऑल इंडिया स्पर्धेत सहभागी होऊन पदक पटकावले आहे. प्रत्येक तालुक्यात क्रीडा महाविद्यालय झाल्यास चांगले खेळाडू तयार होतील, अशी अपेक्षा क्रीडा क्षेत्रातून व्यक्त होत आहेत.

### विद्यापीठात होणार चार वर्षांचा बी.ए. फिजिकल अभ्यासक्रम

विद्यापीठात चार वर्षाचा बी.ए. फिजिकल अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थी सातत्याने मैदानावर राहतील. सर्व विषय 'क्रीडा'चेच असल्याने सरावाबरोबर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे. प्राथमिक पातळीवरील ज्ञान बी.ए.मध्येच मिळाल्याने बी.पी.एड., एम.पी.एड. करणे सोपे जाणार आहे.

### विद्यार्थ्यांना अर्थार्जनाच्या संधी देण्याचा प्रयत्न

नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबर खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अर्थार्जनाची संधी उपलब्ध करून देण्याचा शिवाजी विद्यापीठ प्रयत्न करत आहे. त्यामुळेच प्रत्येक तालुक्याला क्रीडा महाविद्यालयाचा एक स्थळ बिंदू विद्यापीठाच्या बृहत आराखड्यात समाविष्ट केला आहे.

डॉ. पी. एस. पाटील (प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

पुढारी

# युवा महोत्सव तज्ज्ञ परीक्षकासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी परीक्षक म्हणून काम करण्यासाठी इच्छुकांना अर्ज करण्यास ६ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. विद्यापीठाने जिल्हा व मध्यवर्ती महोत्सवाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. महोत्सवात संगीत, नाट्य, स्थळचित्रण, कोलाज, पोस्टर मेकिंग, मातीकाम, व्यंगचित्र, फोटोग्राफी आदी स्पर्धांचे आयोजन केले आहे. यापूर्वी २० जुलैपर्यंत माहिती मागविण्यात आली होती. मात्र, काही कारणास्तव यास मुदतवाढ देण्यात आली आहे. अनुभवी तज्ज्ञांनी प्र-पत्रकात माहिती भरून विद्यापीठ विद्यार्थी विकास यांच्याकडे पाठविण्याचे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले आहे.

पुढारी



# विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी उद्या मतदान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी शनिवारी (दि. २) निवडणूक होणार आहे. दोन जागांसाठी विद्यापीठ विकास आघाडीचे दोन व 'सुटा'चे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी २ सप्टेंबरला निवडणूक होत आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने निवडणुकीची जय्यत तयारी केली आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमधील राजर्षी शाहू सभागृहात दुपारी १ वाजता मतदान होणार आहे. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीकडून जगदीश सपकाळे, वर्षा मैंदर्गी व सुटा संघटनेकडून डॉ. सुनील चव्हाण, डॉ. रूपाली संकपाळ यांच्यात लढत होणार आहे. विद्या परिषदेचे ८३ सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी मतदान करणार आहेत. संघटनांचे आपल्या उमेदवारास मतदान कसे जादा होईल, यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

तरुण भारत



# व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी उद्या निवडणूक

■ दोन जागांसाठी चार उमेदवार निवडणूक रिंगणात

■ विद्यापीठ विकास आघाडी विरूध्द सुटा संघटनेत होणार लढत

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी उद्या (दि. २) सप्टेंबरला निवडणूक होणार आहे. दोन जागांसाठी विद्यापीठ विकास आघाडीचे दोन आणि सुटाचे दोन उमेदवार निवडणूक रिगणात उतरले आहेत. विद्यापीठ प्रशासनाने निवडणूकीची जय्यत तयारी केली आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमधील राजर्षी शाहू सभागृहात दुपारी १ वाजता मतदानाला सुरूवात होणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी शनिवार २ सप्टेंबरला निवडणूक होणार आहे. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीकडून जगदीश सपकाळे, वर्षा मैंदर्गी तर सुटा संघटनेकडून डॉ. सुनील चव्हाण आणि डॉ. रूपाली संकपाळ यांच्यात लढत होणार आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून निवडणूकीची संपूर्ण तयारी झाली आहे. विद्या परिषदेचे ८३ सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागांसाठी मतदान करणार आहेत. संघटनांनी आपल्या उमेदवाराला मतदान कसे जादा होईल, याकडे लक्ष केंद्रीत केले आहे. निवडणूक यशस्वी करण्यासाठी विद्यापीठाने जय्यत तयारी सुरू केली आहे.